Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# संत तुकारामांच्या साहित्यातील सामाजिक विचार

**मुरलीधर बाबाराव हंबर्डे**
संशोधक विद्यार्थी

**प्रास्ताविक**

तत्कालीन समाजव्यवस्था ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णांवर आधारलेली होती. हे चारही वर्ण आपापल्या जातिधर्मानुसार समाजव्यवस्थेतील कार्य करीत होते. परंतु, उच्चवर्णीयात सुखासीनता आणि भोगविलासाची वृत्ती जास्त होती. शूद्रांना समाजव्यवस्थेतील खालच्या पातळीवरील सर्व निकृष्ट दर्जाची सर्व ज ामे करावी लागत असे. ढासळलेल्या समाजव्यवस्थेची व्यवस्थित पायाभरणी करण्यासाठी संतांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. संत परंपरेत सर्वप्रथम संत ज्ञानेश्वरांनी समाजजीवन आणि धर्मसाधना यामधील विरोधाभास नाहीसा करण्यावर भर दिला होता. हे कार्य करीत असताना त्यांनी धर्माला सामाजिक नीतिमत्तेचे अधिष्ठान आणि धर्मसाधनेच्या मर्यादाही दाखवून दिल्या होत्या. त्यामुळे धर्मसाधनेला सामाजिकदृष्ट्या एक नवीन आयाम प्राप्त झाल्यामुळे समाजाला ज-या धर्माची ओळख झाली होती. संत ज्ञानेश्वराप्रमाणेच संत नामदेवांनीसुद्धा समाजव्यवस्थेतील ज्या समस्या आहेत, त्या स्वतःच्याच आहेत असे समजून त्यांनी सामाजिक कार्याची सुरुवात केली होती. एकूणच संताच्या कार्याविषयी ल.रा.नसिराबादकर म्हणतात की, आपल्या काव्यनिर्मितीच्या आणि कर्तृत्वाच्याद्वारे संतांनी समाजाला मानवता, भूतदया, शांती, सर्वांभूती प्रेमभाव, संतमाहात्म्यातून आदर्श व्यक्ती आणि भक्त यांची महती शिकविली. एकप्रकारे तत्कालीन कालखंडातील निद्रिस्त, संत्रस्त आणि बैचेन समाजाला संत ज्ञानेश्वर, नामदेव व इतर संतांनी जागृत केले.

संत परंपरेने तत्कालीन कालखंडातील बिकट अशा सामाजिक पार्श्वभूमीवर मात करण्यासाठी सामाजिक कार्याची सूत्रे हाती घेतली होती. कारण, १२ व्या शतकातील समाजजीवनात जात, वंश, लिंग, धर्म, भाषा आणि वर्ण इत्यादी समस्यांच्या उदयामुळे समाजव्यवस्थेत अराजकता निर्माण झाली होती. त्यामुळे या सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी संत परंपरेचे मोलाचे योगदान लाभले आहे. संतांनी समाजसुधारणा करण्यासाठी जे साहित्य निर्माण केले आणि सामाजिक विचार मांडले, ते परिस्थितीनुरूप उदयास आले आहेत. वारकरी संप्रदायाच्या सामाजिक कार्याचा इतिहास पाहत असताना तत्कालीन कालखंडातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. कारण, तत्कालीन ज ालखंडात वैदिक धर्माची उज्ज्वल परंपरा निष्क्रिय झाल्याने धर्माला मरगळ आली होती. बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार समाजाला प्रेरणा देण्याचे बळ तत्कालीन धर्मसंस्थेत उरलेले नव्हते. अशा परिस्थितीमध्ये परधर्मीय अराजकांनी अवघ्या २० ते २५ वर्षांच्या काळात दक्षिणेकडील हिंदू राज्ये खालसा केली होती. या परिस्थितीला तत्कालीन काळातील धर्मव्यवस्था तितकीच जबाबदार होती. याशिवाय समाजजीवनात यज्ञयाज, व्रतवैकल्ये, जप-तप, दान-दक्षिणा, कर्मकांड, कर्मठ रूढी, प्रथा-परंपरा एवढ्यापुरतेच मर्यादित धर्माचे कार्यक्षेत्र उरले होते. अशा या अराजक परिस्थितीमध्ये समाजसुधारणा घडवून आणण्याबरोबर नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी संतांनी महत्त्वपूर्ज ज ार्य जे ले.

**संशोधन विषयाचे उद्दिष्टे**

१. संत तुकारामाच्या सामाजिक विचाराचे स्वरूप जाणून घेणे.
२. जाती व्यवस्थे विषयी संत तुकारामाचे विचार जाणून घेणे.
३. संत तुकारामाचे अंधश्रद्धा व कर्मकांडा विचाराचा आढावा घेणे.

**तुकोबांच्या सामाजिक विचारांचे स्वरूप**

लोकजीवनातील आचार व्यवहारांची विधिनिषेधांनी केलेली तटबंदी तुकाराम यांच्या झंझावाती अभंगांपुढे नाहीसी झाली. तसेच वेद, शास्त्रे, पुराणे याविषयाचे समान्य जनतेतील अज्ञान आणि न्यूनगंड अभंगांच्या माध्यमातून दूर केले. विधिनिषेधांच्या मर्यादांचे जोखड झुगारण्याचे; सामाजिक जीवनात भरडलेल्या व्यक्तिजीवनात स्वातंत्र्याकांक्षा उद्दिपित करण्याचे कार्यही संत तुकारामांच्या अभंगांनी केले. अनाकलनीय ग्रंथांशिवाय साधली जाणारी पारमार्थिक उन्नती, सहजसाध्य मार्गांनी होणारी ईश्वरांची भेट, कोणत्याही भेदभावाशिवाय त्यांची आराधनापद्धती, सामाजिक जातीयतेला खतपाणी घालण्याऱ्या वृत्तीचा निषेध आणि जगाला मानवतावादी शिकवण देणारी त्यांची विचारधारा हेच संत तुकारामांच्या साहित्यातील सामाजिक विचाराचे स्वरूप होय. तेच स्वरूप आपण काही ठळक मुद्यांच्याआधारे अभ्यासणार आहोत.

**जातीव्यवस्थेसंदर्भातील विचार**

परकियांचे आक्रमण, त्यातच उद्‌भवलेला दुष्काळ आणि रोगराईमुळे समाजजीवन विस्कळीत झाले होते. अशा परिस्थितीत संत तुकाराम समाजाच्या दैनंदिन व्यथांचे तळमळीने चिंतन करीत होते. समाजविघातक परिस्थिती निर्माण होण्यासाठी समाजातील दांभिक, क्रूर आणि पाखंडी लोक जबाबदार असल्यामुळे त्यांचा तुकारामांनी कठोर शब्दात निषेध केला. प्रत्येक जाती-जातीतील, पंथातील आणि धर्मातील पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथा, परंपरा, आणि चालीरीतींवर वार केला. वेद आणि उपनिषदातील गूढ रहस्ये सामान्य जनतेला सोप्या आणि सुलभ भाषेत समजावून सांगितली.[५] संत तुकारामांच्या जनजागृतीमुळे समाजव्यवस्थेतील माळी, तेली, कुणबी, कष्टकरी, शेतकरी आणि बहुजन समाजाला फायदा झाला. याविषयी गंगाधर बा.सरदार म्हणतात की, बहुजन समाजाच्या धर्मश्रद्धेला तत्त्वचिंतनाची आणि चित्तशुद्धीची जोड देऊन मध्ययुगीन जीवनातील जडत्व नाहीसे करणे ही मराठी संतांच्या चळवळीची प्रेरणा होती. समाजाला भौतिक समृद्धीइतकीच सांस्कृतिक नीतिमूल्यांचीही गरज असते हे तुकारामांनी पटवून दिले. समाजव्यवस्थेत पसरलेली मरगळ ही समाजव्यवस्था दूषित करते. त्यामुळे त्यांनी समाजाचे अंतरंग स्वच्छ करज्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करून समाजचिंतनाला नैतिकतेचे अधिष्ठान बनविले होते. समाजात निर्माज झालेल्या विषमतेचे मूळ हे स्वार्थी लोकांत असल्याचे स्पष्ट शब्दांत सांगितले. दांभिक किंवा सनातनी व्यवस्थेने बहुजन किंवा उपेक्षित समाजाचे पिढ्यान्‌पिढ्या शोषण केले. त्यामुळे अशा व्यवस्थेबद्दल तुकारामांच्या मनात अतिशय चीड निर्माण झाली होती. त्यासाठी गुलामगिरीत जीवन जगण्यापेक्षा विठ्ठल भक्तीचा मार्ज स्वीकारावा असा उपदेश, तुकारामांनी बहुजन समाजाला दिला. सनातनी वृत्तीचा विरोध करताना तुकारामांनी अतिशय बंडखोर शब्दात त्यांच्यावर प्रहार केला. त्यांच्या मते, समाजव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

**स्वःजातीबद्दल संत तुज रामाचे मत**

इतर संतांनी अनेकदा प्रश्न विचारल्यामुळे तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांतून स्वत:विषयीची जुरुपदेश व कवित्वस्फूर्ती होईपर्यंतची हकीगत थोडक्यात सांगितली आहे. त्यातून त्यांचा आयुष्यक्रम, कूळ, जात, व्यवसायाचा उल्लेख येतो. एका अभंगात स्वतःचा जीवनप्रवास सांगताना सुरुवातीलाच ते म्हणतात की,

**याति शूद्र वश केला वेवसाव।**
**आदि तो हा देव कुळपूज्य।।१।।**

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

स्वतःच्या जातीबद्दल संत तुकाराम महाराज म्हणतात की, मी जन्माने शूद्र असून वडिलोपार्जित वाण्याचा व्यवसाय केला असल्यामुळे वैश्य या गटात बंदिस्त झालो. माझ्या कुळात मुळापासूनच श्रीविठ्ठल हा देव पूज्य मानला गेला आहे. महाराजांनी प्रथमच या अभंगात आपल्या जातीचा व व्यवसायाचा उल्लेख केला आहे.

**बरा कुणबी केलो।**

**नाहीं तरी दंभेंचि असतो मेलों।**

संत तुकारामांच्या तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये दांभिक वृत्तीने जाती-जातींमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना निर्माण केली होती. त्यामुळे दांभिक वृत्तीची तुकारामांना अतिशय चीड होती. यामुळे ते म्हणतात की, बरे झाले मी कुणब्याच्या पोटी जन्म घेतला नाहीतर दांभिकतेच्या घरात माझा जन्म झाला असता तर मी जगूनसुद्धा मेलोच असतो. एकूण, महाराष्ट्रातील बहुजन समाजाची संस्कृती ही कष्टकरी, शेतकरी आणि दीन-दलितांची असल्यामुळे त्यामध्ये माझा जन्म होऊन सार्थक झाल्याचेही ते नमूद करतात.

**दलितांविषयी प्रेमभाव**

संत तुकारामांनी त्यांच्या हयातीमध्ये जातिभेद केव्हाही केला नाही. शूद्रांविषयी संत तुकारामांच्या मनात अफाट श्रद्धा, जिव्हाळा आणि आपुलकी होती. संत तुकारामांनी स्वतः अनेक हालअपेष्टा सहन केल्यामुळे ते उच्चवर्णीयांच्या विरोधातच होते. शूद्रांविषयी तळमळ व्यक्त करताना ते म्हणतात की,

**'तळमळे चित्त, घातले खापरी, फुटतसे परी लाहीपरी'**

म्हणजेच, तुकाराम म्हणतात की, माझ्या मनात दलितांच्या संवेदनाचे काहूर रक्ताच्या कारंज्याप्रमाणे माजत होते. संत तुकारामांच्या अंतःकरणात दीन दलितांविषयी अपार जिव्हाळा असून दुसरीकडे उच्चवर्णीयाच्या विरोधात बंडखोर भूमिका घेतलेली आहे. यामागे त्यांची भूमिका ही होती की, समाजात सुखशांती नांदावी, सर्व समाजाचे ज ल्याज व्हावे, विठ्ठलाची भक्ती करण्याचा अधिकार उच्चवर्णीयाप्रमाणे शूद्र व स्त्रियांना असावा. तसेच यापुढे जावून तुकाराम म्हणतात की, व्यक्तीचा दर्जा त्यांच्या जातीवरून नाही तर त्यांच्या कर्मावरून ठरविला जावा.

**महारासि सिवे। कोपे ब्राह्मण तो नव्हे।।**

**तथा प्रायश्चित कांही। देहत्याग करितां नाहीं।।**

**नातळे चांडाळ। त्याचा अंतरी विटाळ।।**

**ज्याचा संग चित्ती। तुका म्हणे तो त्या याती।।**

**अवघी एकाचीच वीण। तेथे जै चे भिन्न भिन्न।।**

सर्व भूते एकाच देवापासून झाली आहेत; त्या ठिकाणी अनेक भेद कुठून असणार? अभंगामध्ये तुकाराम म्हणतात की, महारांना शिवल्यावर जो ब्राह्मण विटाळ मानतो तो मुळात ब्राह्मण होऊ शकत -नाही. दुसऱ्यास मानणाऱ्या ब्राह्मणास देहत्यागाचे पायश्चितही कमीच होईल. गंगेच्या पात्रातील पाणी गुरे, ढोरे मुक्तपणे पितात तेव्हा विटाळ होत नाही. परंतु, तेच पाणी महारांनी प्राशन केल्यावर विटाळ होतो असे म्हणणाऱ्या चांडाळाचा संत तुकाराम धिक्कार करतात. तसेच पृथ्वीतलावर सर्व मानव एकाच विठ्ठलाचे लेकरे असल्यामुळे त्यांच्यात भेद करणे मूर्खपणाचे लक्षण आहे, असेही ते म्हणतात.

तुकारामबुवांच्या आधीपासून एक जात उंच, एक नीच असा फरक संताच्या दृष्टीत नसल्याचे दिसून येते. जातिबाह्य, हीन जातीचा, अस्पृश्य, चांडाळ, पापकर्मी यांच्या उद्धाराची सोय भागवतधर्मीय संतांनी केली. 'म्हजौन्ि कुळ उत्तम नोहावें। जाती अंत्यजही व्हावें। परि देहाचेनि नांवें पशूचेही लाभो' अशी ग्वाही ज्ञानेश्वरांनी दिली.

दगडाप्रमाणे पाप योनीतील मूर्ख असले तरी एकदा त्यांची दृष्टी भगवंताकडे लागली की, मग काही उणीव पडू नये. 'जाति कुळवर्ण हे आद्यवेंचि गा अकारण' अशी घोषणा करून ज्ञानेश्वरांनी या क्रांतीकार्यास सुरुवात केली.[१३] तुकोबा याच समत्वाच्या वाटेवर शब्दांचे शास्त्र घेऊन उभे आहेत; हे त्यांच्या अनेक अभंगांतून दिसून येते. एकदा हरीचे अंकित झाल्यावर मग ते जातीचे कुणीही असले तरी 'जाती कुळ नाहीं तयास प्रमाण' असे त्यांनी एके ठिकाणी सांगितले आहे. भक्ती करण्याचा अधिकार सर्वांना असून परमेश्वरापुढे सर्व समान असल्याचे ठामपणे ते त्यांच्या अभंगातून व्यक्त करतात.

**भेदभावविषयी विचार**

भारतीय समाजरचनेत जात आणि वर्ण यांच्या आधारे सनातनी वृत्तीनी माणसामाणसांत भेद केला आहे. जाती-जातींमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची भावना निर्माण केल्यामुळे अनेकदा जातीय दंगलीसुद्धा झाल्या आहेत. निसर्गतः व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणांच्या आधारे श्रेष्ठ किंवा कनिष्ठत्वाची वागणूक देणे योग्य आहे. परंतु, सनातन्यांनी ज्या व्यक्तीचा जन्म उच्च जातीत झाला तो श्रेष्ठ आणि ज्यांचा जन्म कनिष्ठ जातीत झाला, तो कनिष्ठ अशी रचना केली होती. यामुळे ही पद्धत मानवाच्या मुक्त विकासासाठी बंदिस्त ठरली आहे. या चालत आलेल्या परंपरेमुळे अनेक कर्तृत्ववान व्यक्तीचा बळी घेतला आहे. याच परिस्थितीने संत तुकारामांच्या काळात उग्र रूप धारण केले होते. स्पृश्य आणि अस्पृश्य असा जो काही भेद आहे, याविषयी तुकारामांनी बारकाईने निरीजण केले होते. त्यामुळे त्यांनी व्यक्ती-व्यक्तींमध्ये भेद करणे हे अनैतिक कार्य असून समतेचा आचारविचार हीच खरी नीती व धर्म असल्याचे म्हटले. अशा दांभिक वृत्तीला विरोध करण्यासाठी त्यांनी अनेक अभंगांची रचना करून या प्रवृत्तीवर हल्ला चढविला.

**अवघी एकाचीच वीण। तेथे कैचे भिन्न भिन्न।।**
**देव निराळा निराळा। विटाळा तुका म्हणे।।**
**काय काशी करिती गंगा। भीतरि चांगा नाही तो।।**
**अधणीं कुचर बाहेर तैसा। नये रसा पाकासि।।**
**काय टिळे करिती माळा। भाव खळा नाहीं त्या।।**
**तुका म्हणे प्रेमें विण। बोले भुंके अवघा शीण।।**

अभंगात तुकोबा म्हणतात की, जर अंतरंग शुद्ध नसेल तर बाहेरच्या काशीयात्रेचे व गंगास्नानाचे काहीही महत्त्व नाही. एखादा कठीण दाणा अधणात शिजविला तरी तो तसाच टणक राहतो, शिजत नाही की मऊही होत नाही. त्याचा शिजून रसही होत नाही त्याप्रमाणे अंतरंग कठीण असेल तर उपयोग होत नाही. केवळ कपाळावर टिळे आणि गळ्यात माळा घालून काय उपयोग? सर्वांप्रति असणाऱ्या एका प्रेमभावाशिवाय जो बोलतो ते त्याचे निरर्थक भुंकणेच असते.

**देव निराळा निराळा। अलिप्त विटाळा तुका म्हणे।।**
**गंगा न देखे विटाळ। ते चि रांजणी ही जळ।।**
**नाही विचारीत। मेघ हागनदारी सेत।।**
**नये पाहो त्याचा अंत। ठेवी कारणापे चित्त।।**
**वर्जीत गंगा। नाही उत्तम अधम जगा।।**
**तुका म्हणे मळ। नाही अग्नीसी विटाळ।।**

वरील विविध अभंगांमध्ये स्पृश्य किंवा अस्पृश्य याविषयी संत तुकाराम यांनी विचार मांडले आहेत. पृथ्वीतलावर सर्व मानव विठ्ठलाचे लेकरे असल्यामुळे त्यांच्यात भेद करणे अशक्य आहे. जो चांडाळ महाराला शिवल्यावर विटाळ मानतो त्यांच्या मनामध्येच विटाळ ठासून भरलेला असतो. मेघ राजा जेव्हा निसर्गाला पाणी देतो, तेव्हा हे शेत चांगले वा घाणेरडी जागा असा विचार कधीच करीत नाही. मेघासारखी आपली दृष्टी सर्वांप्रति समत्वाची असावी. हे जग उत्तम की अधम, याचा विचार न करता गंगा नदी सर्वांना पाणी पुरवीत असते. त्याचप्रमाणे जंजा ज़िं वा इतर नद्यांमध्ये हागणदरी किंवा नाले इतर ठिज़ाणाहून पाणी वाहून येते. त्यावेळी नदी भेदाभेद करीत नाही. तसेच तुकोबांनी चालत आलेल्या प्रथा व परंपरांची चौकट मोडून शूद्र व स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, जागृती आणि नवीन अस्मिता निर्माण केली. आजच्या विद्रोही साहित्याची खूप खोलवर रुजलेली पाळेमुळे ही संत तुकारामांच्या विद्रोही साहित्याची देण आहे.

**जातीपेजा व्यक्तीच्या गुणांना महत्त्व**

संत तुज़ारामांनी विविध अभंगांची निर्मिती करून एकप्रकारे जातीपेक्षा गुणांना जास्त महत्त्व दिले आहे. व्यक्ती उच्च जातीत जन्म घेतली म्हणून श्रेष्ठ नाही तर तो त्याच्या कर्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो, असे म्हटले आहे. याविषयी प्र.न.जोशी म्हणतात की, ''पाखंड खंडणाबरोबर धर्माचे पालणही तुकोबांना अभिप्रेत होते. यासाठी एक प्रमुख गोष्ट त्यांनी केली; ती अशी की, नामसंकीर्तनाचा सोपा भक्तिमार्ग बलिष्ठ केला. नाना साधने, नाना कर्मकांड, नाना मतांतरे, नाना तीर्थव्रते, नाना जपतपादी साधने यांच्या जंजाळातून लोकांना मुक्त करून अंत:करणाच्या शुद्ध उपासनेचा एक नवा लोकधर्म जो ज्ञानेश्वरांनी प्रवर्तित केला होता, त्याचा त्यांनी पुनरूद्धार केला. यासाठी पूर्वपरंपरेने आलेल्या जन्मात जातिभेदास त्यांनी थारा दिलेला नाही.''

**उजळावया आलो वाटा। खरा खोटा निवाडा।।**

तुकाराम महाराज वरील अभंगामध्ये म्हणतात की, समाजातील काही अपप्रवृत्ती लोकांनी सत्य नाज़रून खोट्या विचारधारेचा प्रसार केला होता. त्यामुळे खरे काय ? आणि खोटे काय ? यांचा निवाडा करून समाजाला प्रकाशमय मार्ग दाखविणे आवश्यक आहे. भक्तीमार्गाच्या वाटा स्वच्छ करण्यासाठी, त्यांच्यावर प्रकाश टाकण्यासाठीच मी येथे आलो आहे, हे ते आवर्जून सांगतात.

**कस्तुरी भिनली जये मृत्तिके। तये आणिके कैसी सरी।।**
**तुका म्हणे मी न वजें यातीवरी। पूज्यमान करीं वैष्णवांसी।।**
**लोखंडाचे अंगी लागला परिस। तया आणिकास कैसी सरी।।**

समाजामध्ये जे अमंगळ आहे, ते शुद्ध करण्याची क्षमता ज्याप्रमाणे कस्तुरीच्या गुणवैशिष्ट्यामध्ये आहे. त्याचप्रमाणे लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला तर संपूर्ण लोखंडांचे रूपांतर सुवर्णामध्ये परावर्तीत करण्याची क्षमता परिसात आहे. त्याचप्रमाणे समाजातील शूद्र व्यक्तीमध्येसुद्धा कस्तुरी आणि परिसाप्रमाणे चांगले गुण आहेत. त्यामुळे त्यांच्या कौशल्यांना वाव देणे महत्त्वाचे आहे. तुकोबा म्हणतात की, मी कधी जातीवर जाणार नाही, जातीकडे दृष्टी देणार नाही. तो विष्णुभक्त आणि गुणकर्माने चांगला असेल तर त्यास मी पूज्य मानीन.

संत तुकाराम महाराजांनी जाती किंवा धर्मव्यवस्थेतील भेदभाव नष्ट करण्यासाठी वरील वेगवेगळ्या अभंगांची निर्मिती केली आहे. यातून त्यांनी समाजातील एकात्मता टिकवून राहण्यासाठी व जातीव्यवस्थेने निर्माज केलेले कृत्रिम भेदभाव नष्ट करण्यासाठी कठोर प्रयत्न केले आहेत.

**अंधश्रद्धा, रूढी व परंपरेवर हल्ला**

व्यक्तीतील आत्मविश्वासाचा जेव्हा पराभव होतो, तेव्हा माणूस अंधश्रद्धेला बळी पडत असतो. व्यक्ती आपल्या सद्सद्विवेकबुद्धीने प्रतिकूल परिस्थितीमध्येही प्रयत्न करतो; परंतु कर्माचे फळ मिळण्याऐवजी नशिबी सातत्याने अपयशच येते, तेव्हा व्यक्ती आपला विवेक गमावून बसतो. त्यामुळे दिवसेंदिवस व्यक्तीमधील आत्मविश्वास, विवेक, तारतम्य आणि कार्यकारणभाव लोप पावल्यामुळे तो पूर्णपणे अंधश्रद्धाळू बनत असतो. तसेच पूर्वीपासूनच चालत आलेल्या अंधश्रद्धेच्या जाळ्यात पूर्णपणे अडकला जातो. संत तुकारामांच्या काळामध्ये अंधश्रद्धेच्या नावाने अनेकांनी दुकानदारी सुरू केली होती. व्रतवैकल्ये, जप, जादूटोणा, नवस, अंगात येणे, तीर्थयात्रा, हुंडा पद्धती इत्यादी अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या बाबींना संत तुकारामांनी कडाडून विरोध केला. ''धर्म, भक्ती, ज्ञान, कर्म, पूजा यांचे यथार्थ स्वरूप न जाणता ज्यांनी-ज्यांनी स्वार्थापोटी, अज्ञानाचे वा अपूर्ण ज्ञानाचे अध्यात्मक्षेत्रात स्वमत प्रतिपादन करून ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला, विचार प्रदूषण वाढविले, त्या सर्वांशी तुकारामांनी धर्मयुद्ध पुकारले.''[३५] यावरून संत तुकाराम यांनी अंधश्रद्धा, रूढी, परंपरेवर कसा हल्ला केला हे लक्षात येते.

**ढोंगी किंवा भोंदू साधूंवर प्रहार**

तत्कालीन परिस्थितीमध्ये ढोंगी किंवा भोंदू साधूंचे समाजात पीक आले होते. हे साधू भक्तीच्या नावाखाली समाजाची फसवणूक करीत होते. अशा साधूंवर संत तुकारामांनी अभंगांच्या माध्यमातून हल्ले चढविले.

**ऐसे संत जाले कळीं। तोंडी तमाखूची नळी।।**
**स्नानसंध्या बुडविली। पुढे भांग वोडवली।।**
**भांगभुर्का हें साधन। पची पडे मद्यपान।।**
**तुका म्हणे अवघें सोंग। तेथे कैचा पांडुरंग।।**

वरील अभंगामध्ये संत तुकाराम महाराज म्हणतात की, ज्यांच्या तोंडात सतत तंबाखूची नळी ठेवणाऱ्या ढोंगीना संत म्हणावे का? हा प्रश्न निर्माण केला. तसेच भांग आणि मद्यपानाचे सेवन करून स्वतःला साधू म्हणवून घेतात; अशा साधूंची सेवा करून पांडुरंग भेटेल का? असा प्रश्न समाजाला विचारतात. पुढे ते असेही म्हणतात की, ज्या ठिकाणी व्यभिचार माजला आहे, दंभ, कपटी, अनीती आणि भ्रष्टाचार यांनी कळस गाठला आहे, तेथे विठ्ठलाचे अस्तित्व पहावयास कसे मिळणार? असाही प्रश्न उपस्थित केला आहे. अशा व्यभिचारी संतामुळे समाजाचे चारित्र्य, सत्य, प्रामाणिकपणाचा ऱ्हास होत असल्याची भावना व्यक्त केली.

**तुका म्हणे शिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा।।**

समाजातील वैराग्याचे ढोंगी सोंग करून व्यक्तींना फसविणाऱ्या लोकांबद्दल संत तुकाराम वरील अभंगात शिंदळीच्याही शिवी वापरतात. दुष्कर्माची वाट मोडून काढण्यासाठी तुकोबांनी ही कडक भाषा वापरली आहे. शिवाय, ढोंगी टिंगणावर त्यांनी कोरडे ओढले. ढोंगी व भोगवादी अशा लोकांना साजूक उपदेश उपभोगाचा नसतो आणि अशा लोकांकडे दुर्लक्ष करूनही भागणारे नसते. म्हणून, अशा या ढोंगी आणि भोंदू लोकांवर तुकाराम चौफेर हल्ले करतात. अंतःकरणात पापवासनेची ओढ असणारे देवाची कथा करून प्रेमकळा दाखवतात. टिळा, टोपी, माळा घालून पोट भरण्याचा उद्योग करतात. गोसाव्याच्या वेशाने परनारी हेरण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या अंतःकरणात काम आणि लोभ भरलेले असते. अशा खोट्या व ढोंगी लोकांच्याजवळ देव असत नाही म्हणून, या लोकांपासून लोकांनी सावध राहिले पाहिजे असे संत तुकाराम सांगतात.

**सारांश**

तत्कालीन कालखंडातील बिकट अशा सामाजिक पार्श्वभूमीवर मात करण्यासाठी सामाजिक कार्याची सूत्रे हाती घेतली तेव्हा समाजजीवनात जात, वंश, लिंग, धर्म, भाषा आणि वर्ण इत्यादी समस्यांच्या उदयामुळे समाजव्यवस्थेत अराजकता निर्माण झाली होती. त्यामुळे या सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी संत तुकारामांनी मोलाचे योगदान दिले आहे. समाजसुधारणा करण्यासाठी जे साहित्य निर्माण केले आणि सामाजिक विचार मांडले, ते परिस्थितीनुरूप उदयास आले आहेत. वारकरी संप्रदायाच्या सामाजिक कार्याचा इतिहास पाहत असताना तत्कालीन कालखंडातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. कारण, तत्कालीन कालखंडातील वैदिक धर्माची अतिरेकी विषमता आणि कर्मकांडी धोरणामुळे बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार समाजाला प्रेरणा देण्याचे बळ त्यांच्याकडे उरलेले नव्हते. अशा परिस्थितीमध्ये परधर्मीय अराजकांनी अवघ्या २० ते २५ वर्षांच्या काळात दक्षिणेकडील हिंदू राज्ये खालसा केली होती. या परिस्थितीला तत्कालीन काळातील धर्मव्यवस्था तितकीच जबाबदार होती. याशिवाय समाजजीवनात यज्ञयाग, व्रतवैकल्ये, जप-तप, दान-दक्षिणा, कर्मकांड, कर्मठ रूढी, प्रथा-परंपरा एवढ्यापुरतेच मर्यादित धर्माचे कार्यक्षेत्र उरले होते. अशा या अराजक परिस्थितीमध्ये समाजसुधारणा घडवून आणण्याबरोबर नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी संत तुकारामांनी महत्त्वपूर्ण कार्य केले.

**संदर्भग्रंथ**

१. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ६ वी आवृत्ती-१९९७
२. शेणोलीकर ह.श्री, प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, १९९७,
३. ज़ु लकर्णी सुनील, कबीर और तुकाराम के काव्य में प्रगतशील चेतना, विकास प्रकाशन कानपूर, प्रथम आवृत्ती २००७
४. पाटील तान्हाजी, समाजजीवनातील संत तुकाराम, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००८,
५. सरदार गंगाधर बाळकृष्ण (संपा.), अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची, प्रकाशन मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्रथमावृत्ती १९६८
६. लाड पुरूषोत्तम मंगेश (संपा.), श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा, अभंग : १३३३, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, प्रकाशन वर्षे १९७३
७. जोशी प्रल्हाद नरहर, सार्थ तुकारामगाथा, खंड पहिला, श्री भारत बुक डेपो, ग्रंथप्रकाशन, मुंबई,
८. इनामदार हे.वि. (संपा.), अनुभव तुकोबांचा, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९४
९. साळुंखे आ.ह., विद्रोही तुकाराम, सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, १९९७,
१०. डांगे रामदास (संपा.), धावे अंतरीचे, प्रकाशक ॲड.शेषराव भरोसे, परभणी, प्रथम आवृत्ती १९९८,